Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-4 | Issue-6 | Dec-2014
Available online at www.lbp.world

# भंडारा जिल्हा मत्स्य व्यवसाय संघ विकास व सरकारी धोरण

डॉ. महादेव मारोती बन्सू[१] , डॉ. दिलीप वैरागडे[२]
संशोधक, डॉ. एल.डी.बलखंडे कला व वाणिज्य महाविद्यालय पवनी जि.भंडारा.
मार्गदशक, विमेन्स् कॉलेज ऑफ आर्ट्स अॅण्ड कॉमर्स, नागपुर.

**प्रस्तावना**

''बिना सहकार नही उध्दार'' किंवा ''एकमेंका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ'' या ब्रिद वाक्यानुसार समाजाची ऋणग्रस्तता दुर करण्यासाठी स्वेछेने आणि समानतेच्या भावनेने समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्तींची संघटना होय. जिचे कार्य लोकशाही प्रणाली नुसार चालते.

एकमेकांच्या सहकार्याने आपल्या आर्थिक अडचणी सोडविण्याच्या भावनेतून सहकारी चळवळीचा उगम झाला. मानव जात पृथ्वीतलावावर निर्माण झाल्यापासुन सामाजिक व सहकार्याने जीवन जगण्याची मानवाची उपजत प्रवृत्ती दिसुन येते. एकत्र राहणे, एकत्र काम करणे ही मानवी जीवनाची नैसर्गिक सहजप्रवृत्ती आहे. या सहजप्रवृत्ती मधूनच मानवाची समजाशिलता उगम पावली आहे. नैसर्गिक साधन सामुग्रीचा शोध घेणे उत्पादन करणे, शत्रुशी मुकाबला करणे, नैसर्गिक आपत्तीना तोंड देणे इत्यादी गोष्टी मानवाने संघर्षापेक्षा सहकार्यावर भर देवून साध्य केलेल्या आहेत. मानवाच्या सर्वांगीन प्रगतीचे मुळ सहकार्य आहे. सहकार्याचे तत्व मानवी समाजाइतकेच पुरातन आहे. सहजिवनाच्या उदात्त भावनेतून मानवाचा आर्थिक, सामाजिक तसेच सांस्कृतीक विकास झाला. सहकार ही मानवाच्या सहजीवनाच्या कल्पनेची प्रगत अवस्था होय, की ज्यामध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक विकासासाठी एकत्र येण्याची प्रेरणा मानवात प्रखरपणे निर्माण होते. सहकार ही लोकशाही, चारीत्र्य, बंधुभाव, शांतता, देशाची एकता व अखंडता आणि प्रगती या अधिष्ठानावर आधारलेली अशी आदर्श समाज व्यवस्था होय, की ज्यामध्ये समान निष्ठा असणारे लोक आसपल्या कल्याणासाठी एकत्र येत असतात.

प्रस्तुत प्रकरणात राष्ट्रीय विकास निगमाकडून कर्ज व अनुदान डि.सी.सी. कडून कर्ज आणि पंचवार्षिक योजना काळात शासनाद्वारे करण्यात आलेल्या तरतूदीचा आढावा घेतला आहे. भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी तसेच शेतीला पुरक व्यवसाय म्हणून मत्स्य व्यवसायाचा विकास या दृष्टीने भंडारा जिल्हा मत्स्य व्यवसाय संघ मर्यादित भंडाराची स्थापना दिनांक ३०/०६/१९७६ रोजी सहकारी तत्वावर करण्यात आली हया संघाचे मुख्य कार्य प्राथमिक मत्स्य व्यवसाय संस्थाकडून मत्स्य उत्पादन करणे व त्यांना मत्स्यबिज व नौका, नॉयलॉन जाळी, बर्फ व इतर साहित्य पुरविणे, मत्स्य उत्पादन झाल्यानंतर संघाला विक्रीसाठी पाठविणे इत्यादी कार्य संघाला करावे लागते.

मत्स्य संकलित करण्यसाठी मत्स्य बिज पाठविण्यासाठी संघ स्वत:च्या गाडया पाठविते, गाडया अपुऱ्या असल्यामुळे जिल्हा संघ कंत्राट पध्दतिने मत्स्याचे संकलन करते तसेच मत्स्य टिकविण्यासाठी तसेच संघाचा संपुर्ण कार्यभार सुव्यवस्थित रितीने चालावा यासाठी संघाच्या मुख्य कार्यालयात कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

भंडारा जिल्हा मत्स्य व्यवसाय सहकारी संघ वाहतुकीचा मत्स्यबिज, नौका, नॉयलान, जाळे तसेच व्यवस्थापनाचा खर्च तसेच इतर प्रकारचा खर्च करण्यासाठी पैसा कोठून आणायचा? हया सर्व बाबीवरील खर्च कसा भागवितो? हे जाणून घेणे आवश्यक आहे तसेच

मत्स्य संकलन, वितरण व हस्तांतरण हा संघाचा व्यवसाय आहे. कोणताही व्यवसाय सूरळीतपणे चालविण्यासाठी व व्यवसायाच्या दैनंदिन आर्थिक गरजा भागविण्यासाठी प्रत्येक व्यवसायीक संस्थेला कमी अधिक प्रमाणात भांडवलाची गरज असते.

त्यासाठी संघाला शासनाकडून अनुदान प्राप्त होते परंतु हे अनुदान अपुरे पडते त्याची पुर्तता करण्यासाठी संघाला राष्ट्रीय विकास निगम कर्ज व अनुदान देतो तसेच भंडारा जिल्हयात को. ऑपरेटिव्ह सहकारी बँकेद्वारे कर्ज घेत असते. अशा प्रकारे व्यवस्थापन चालविण्यात येते.

महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर अनेक जलाशय तयार झाल्याने आणि मत्स्य शेतीचे तंत्र विकसीत झाल्याने पाण्यातील मासेमारीचे क्षेत्र वाढले, मत्स्योत्पादानाची क्षमता वाढली आणि या व्यवसायास चालना मिळाली, विकसीत तंत्राने उत्पादनातील अनिश्चीतता कमी झाली पण या व्यवसायावर अवलंबुन असलेला मच्छीमार समाज गरीब असल्याने या तंत्राचा वापर करण्यासाठी तसेच नव्याने उपलब्ध झालेल्या जलक्षेत्रात मासेमारी करण्यासाठी शासनाचे पाठबळ आवश्यक आहे. शासनाचेही धोरण व आर्थिक दृष्टया मागास घटकाच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीकरीता अनुकूल बनले व पंचवार्षिक योजनांमधून मत्स्य व्यवसायाकरीता आर्थिक व इतर सोयी–सवलती मिळू लागल्या.

**मस्यबिज :**

मत्स्यशेतीतील मत्स्यबीजाच्या बराचसा पुरवठा कलकत्याहुन होतो अलीकडे बीज पुरवठयाचे काम महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघाकडे सोपविले आहे. संघ वाजवी किंमत आकारून सहकारी संस्थाना व इतर मच्छकास्तकारांना बीजाचा पुरवठा करतो. त्यावर मच्छीमार सहकारी संस्था, ग्रामपंचायती व इतर स्थानिक संस्था यांना ३३ १/३ टक्के दराने मिळणारे अनुदान वजा करूनच बीजाची किंमत आकारली जाते. जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेकडून मत्स्यबीजावर सहकारी संस्थाना ५० टक्के अनुदान मिळू शकते. मच्छिमारांना बिजाचा तुटवडा जाणवू नये म्हणून बिजाचे उत्पादन आपल्या राज्यातच मोठया प्रमाणावर काढण्यासाठी शासनाने भरपुर गुंतवणूक करून मत्स्यबिज केंद्र स्थापन केली आहेत. या केंद्राचा बांधकामास व व्यवस्थापन खर्चे मच्छिमार वर्गास करावा लागत नसल्यामुळे ही शासनाची या व्यवसायाला अप्रत्यक्ष मदत होय.

**मत्स्यशेती :–** ठेक्याने घेतलेल्या किंवा स्वत:च्या तलाव मत्स्यशेतीकरीता सर्व दृष्टीने सोयीचा करून घेण्याकरीता त्यात काही दुरूस्त्या आवश्यक असतात. तळयातला गाळ काढून तो खोल आणि बारमाही करण्याची जरूरी पडते. या कामासाठी २५ टक्के अनुदान व ७५ टक्के कर्ज मिळते. मत्स्यबिजाचे संगोपन करण्यासाठी संगोपन तळी बांधण्याला तसेच मत्स्यशेतीसाठी तळी बांधण्याला शासनाकडून प्रोत्साहन मिळते. या बांधकामासाठी २० टक्के अनुदान ८० टक्के कर्ज मिळते.

**मच्छीमार साधने :–** मच्छीमारी करण्यासाठी जाळी व नावा यांची आवश्यकता असते. अधिक कार्यक्षम व टिकाऊ अशा नॉयलॉन जाळयांचा वापर अलीकडे वाढला आहे. या नॉयलॉन सुताची किंमत बरीच जास्त असल्यामुळे त्यांच्या खरेदीवर भरघोस मदत तर शासनाकडून मिळतेच, पण या सुताचा पुरवठा जिल्हा किंवा विभागीय मच्छीमार सहकारी संघाकडून प्राथमिक सहकारी संस्था मार्फत त्यांच्या संभासदांना अनुदानयुक्त दराने केला जाण्याचीही व्यवस्था केली जाते. त्याकरीता नॉयलॉन व मोनोफिलॅमेंट सुताच्या मुळ किंमतीच्या ५० टक्के अनुदान संघांना दिला जाते.

**सुरक्षा, वाहतुक व विक्री :–** मच्छीमार सहकारी संस्थांनी उत्पादन केलेली मासळी चांगल्या स्थितीत विकली जाऊन किफायतशीर भाव मिळावा म्हणून मासळी पकडल्याबरोबर लगेच बर्फात टिकवून ठेवणे आवश्यक असते. करीता बर्फ कारखाना व शीतगृहाची गरज पडते. जर संस्थेला किंवा संघाला असा बर्फ कारखाना किफायतशिरपणे चालविण्याएवढी विकास निगमच्या पध्दतीने बर्फ कारखाना व शीतगृह बांधण्यासाठी १०० टक्के अर्थसहाय्य मिळते. संघात निगमचे ७५ टक्के कर्ज व ५ टक्के भागभांडवल मिळते व राज्य शासनाचे २० टक्के विशेष परतीचे भागभांडवल मिळते व त्याचे कर्जफेडीनंतर अनुदानात रूपांतर होते. मासळीची उत्पादनाच्या ठिकाणापासून विक्रीच्या ठिकाणापर्यंत किंवा रेल्वे वाहतुकीसाठी सोयीस्कर स्टेशनापर्यंत वाहतूक करण्यासाठी ट्रक, टेंपो, डिलीव्हरी व्हॅन, रेफ्रिजरेटेड व्हॅन वगैरे वाहनांची गरज पडते. यावरही राष्ट्रीय सहकारी विकास निगमकडून ७५ टक्के कर्ज व राज्य शासनाकडून २५ टक्के अनुदान मिळते. मासळीची खरेदी विक्री करण्याचा व्यवहार संस्थेने हाती घेणे संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असते. पण त्यासाठी लागणारे खेळते भांडवल गुंतवण्याची कित्येक संस्थांची किंवा संघाची ऐपत नसते. अशा संस्थाना बँकाकडून पुरेसे कर्ज घेणे शक्य व्हावे

यासाठी. त्यांना जो पैसा (मार्जिन मनी) गुंतवावा लागतो. त्याकरीता राष्ट्रीय सहकारी विकास निगमाकडुन मदत मिळते. हि मदत भागभांडवलाच्या स्वरूपात मिळते.

**१) विकास अनुदान व कर्ज उभारणी :—**

जिल्हा सहकारी मत्स्य व्यवसाय संघ मत्स्याचे उत्पादन संकलन व हस्तांतरण करते तसेच संघाचे कार्यक्षेत्र व कामाचा व्याप इ. बाबी विचारात घेवून शासकीय मत्स्य योजनेकडून सहकारी संघाला विकास अनुदान म्हणुन देण्याचा रकमादरवर्षी शासनाकडून मंजुर करण्यात येतात.

संघाला शासनाकडून वेळोवेळी पुढील प्रकल्प विकास अनुदान प्राप्त झाले.

**तालीका क्र. १**

| अ.क्र. | वर्ष | अनुदान (रू.) |
|---|---|---|
| १ | १९९१—९२ | ———— |
| २ | १९९२—९३ | ———— |
| ३ | १९९३—९४ | ———— |
| ४ | १९९—९५ | १९०८१०५.०३ |
| ५ | १९९५—९६ | १३३१४०२.५७ |
| ६ | १९९६—९७ | ११७८१८४.३२ |
| ७ | १९९७—९८ | ७००६३५.५३ |
| ८ | १९९८—९९ | ५३२९५५.७२ |
| ९ | १९९९—२००० | ४२९०९५.०० |
| १० | २०००—२००१ | ४९००६८.०३ |
| ११ | २००१—२००२ | ———— |

{संदर्भ :— संघाचे वार्षिक अहवाल}

वरील तालीका वरून स्पष्ट होते कि प्रकल्प अनुदान १९९४—९५ या आर्थिक वर्षात सर्वात जास्त अनुदान प्राप्त झालेले आहेत. एकात्मीक जलाशय मत्स्य व्यवसाय प्रकल्प विभागाकडून संघाला मत्स्य बीज, नॉयलॉन सूत, डोंगे आणि इतर खरेदी तसचे कार्यालयीन खर्च करण्यासाठी शासनाच्या योजनेप्रमाणे ५० टक्के अनुदान प्राप्त झालेले आहे. हया रकमेएवढीच रक्कम संघाने सुध्दा गुंतवावयाची होती परंतु जवळ स्वत:चे भांडवल नसल्याने संघाला इतरत्र वित्तीय संस्था व बँकाकडून कर्जाची मागणी करावी लागली होती.

तसेच सन १९९५ पासुन सन २००१ पर्यंत पुन्हा एकात्मिक जलाशय मत्स्य व्यवसाय प्रकल्प विकास योजनेअंतर्गत संघाला मत्स्यबिज, नॉयलॉन सूत, खरेदीसाठी ५० टक्के अनुदान प्राप्त झाले आहे. तसेच या अनुदानातुन कर्मचाऱ्याचे वेतन प्रकल्पासाठी झालेला सर्व प्रकारचा खर्च समाविष्ट आहे. संघाचे अध्यक्ष, संचालक, कार्यकारी संचालक व कर्मचारी यांची मुलाखत झाल्यानंतर असे निदर्शनास आले की भंडारा जिल्हा मत्स्य व्यवसाय सह. संघाने एकात्मिक जलाशय मत्स्य व्यवसाय प्रकल्प विकास योजनेअंतर्गत अनुदान घेणे सुरूच आहे. सन २००१—२००२ या काळात संघाने कसल्याही प्रकारचे अनुदान विकास योजनेअंतर्गत प्राप्त केले नाही असे लक्षात आले.

यावरून असे लक्षात येते की, संघाची आर्थिक स्थिती चांगली नाही हे निदर्शनास येते.

**२} राष्ट्रीय विकास निगमाकडून कर्ज/अनुदान :—**

सन १९९२—९३ या वर्षात संघाच्या कार्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून २४,४५० रू. कर्ज घेण्यात आले. १९९३—९४ या वर्षात संघाने पुन्हा रू. ४१,६९,१५० कर्ज घेण्यात आले असून गाडी खरेदीसाठी घेतलेल्या कर्जापैकी २४,४५० रू. परत करण्यात आले. १९९४—९५ या वर्षात संघाने राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून प्रकल्प कामाकरीता दुसऱ्या हप्त्याची रक्कम रू. ६२,८६,००० प्राप्त झाली त्यामुळे राष्ट्रीय सहकार विकास निगमची एकुण कर्जबाकी रू. १,०४,५५,१५० ऐवढी झाली आहे. हयात प्रकल्प कामाकरीता रू. १,०२,८४,००० व संघाची गाडी कर्जापैकी रू. १,७१,१५०.०० समावेश आहे.सन १९९६—९७ या वर्षात राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

सन १९९७—९८ या वर्षात एन.सी.डी.सी. कडून गोडाऊन बांधणीसाठी घेतलेली रू. ३,२४,३०० व मुक्त प्रत्याय नॉयलॉन जाळे रू. १,००,००० मिळून एकूण कर्ज रू. १,१६,६६,८३२.३० रू. आहे. हयात रू. ११,०३,८८,५०० एन.सी.डी.सी चे कर्ज आहे. सन १९९८—८९ या अहवाल वर्षात एन.सी.डी.सी. कडून रू. ४२,०६,००० प्राप्त झाला. सन १९९९—२००० या अहवाल वर्षात एन. सी.डी.सी. कडून रू. ८,००,००० कर्ज प्राप्त झाले. सन २०००—२००१ तसेच २००१—२००२ या आर्थिक वर्षात एन.सी.डी.सी. कडून कोणतेही कर्ज घेतलेले नाही.

सन २००१—२००२ पर्यंत भंडारा जिल्हा मत्स्य व्यवसाय संघ भंडारा यांनी राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून एकूण रू. १,६०,४४,८५० कर्ज घेतलेले आहे. यात मत्स्य व्यवसाय प्रकल्प रू. १,५२,९०,००० व रू. ७,५४,८५० परिवहन व मासळी पणन व गोडाऊन बांधणी यांचा समावेश आहे.

अश्या प्रकारे ट्रक्स, डोंगे, नॉयलॉन जाळे खरेदी, मत्स्यबिज खरेदी व प्रशासकीय खर्चासाठी तसेच प्रकल्प राबविण्यासाठी शासनाकडून व राष्ट्रीय विकास निगमकडून कर्ज व अनुदानाच्या रूपाने आर्थिक मदत मिळाली.

**निष्कर्ष**

वरील माहितीवरून निदर्शनास येते की भंडारा जिल्हा मत्स्य व्यवसाय सहकारी संघ भंडारा यांनी वेळोवेळी एन.सी.डी.सी. कडून कर्ज घेतले असून त्यात वाढ झालेली आहे. कर्जाची परतफेड होवू शकली नाही त्यामुळे एन.सी.डी.सी. कर्ज वाढत आहे. यावरून लक्षात येते की संघाची आर्थिक स्थिती चांगली नाही.

वरील परिस्थितीवरून असे लक्षात येते की, संघाला कोणत्याही वित्तीय संस्थेकडून मदत घेण्याची गरज आहे.

**संदर्भ :—**

१. सहकार परिचय, शरदचंद्र कोपर्डेकर, प्रा. सि.जे.जोशी, हिमालय पब्लिशींग हाऊस, गिरगाव
२. सहकारी संस्था अधिनियम १९६०, वं.श.जोशी, प.व.जोशी, न्यायदीप प्रकाशन पुणे
३. भारतीय शेतीचे अर्थशास्त्र, प्रा. डॉ.विद्यार्जन
४. सहकाराची कार्यपध्दती, पाध्ये,कुलकर्णी, विद्या प्रकाशन,नागपुर
५. भंडारा जिल्हा मत्स्य संघाचे अहवाल
६. गोडया पाण्यातील मत्स्यशेती, मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन